# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २०/०५/२०२३

➢ विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ७ | १० |
| १. | पोस्टे राजापेठ अप क्र क्रमांक ४७०/२०२३ कलम ३५४, ३२३,५०४, ५०६, ४४८, ३४ भादवी | .15/05/2023 चे 20.30 वा दरम्यान दा तावेळ दि २०/५/२३ चे १५.४१ वा वा | 1. एक महिला 2. संतोष डिक्याव | मि समक्ष पोस्टे ला हजर येवुन जबानी रीपोर्ट देते की, 16/5/23 रोजी रात्री 08.30 वा दरम्यान माझे दोन नातेवाईक माझ्या घरी आले व मुलांचे जुन्या भांडनाचे कारणावरुन माझ्या सोबत भांडण करत माझ्या घरात घुसले आरोपी क्र ०१ हिने माझे केस पकडले व आरोपी क्र ०२ याने माझ्या साडीने गळयाला धरुन माझ्या हाताला पकडुन छाती दाबली आरोपी क्र ०१ हिने लाता भुक्यानी मारहान केली व शिवीगाळ करत मला म्हटले की तुझा पती येथे राहत नाही तु येथुन निघुन जा अशा धमक्या दिल्या म्हणुन मी पोस्टे ला आली असता मला तेथील पोलीसांनी टोत बसुन रेडीयंट हॉस्पीटल येथे पाठवीले तेथे माझ्यासोबत माझी सासु व सासरे होते तेथे मी दोन दिवस ॲडमीट होती . मला डाव्या हाताला मुका मार होता व गळयाल पण मुका मार होता तरी त्याचे विरुध्द कायदेशीर कारवाही करीता रीपोर्टदेत आहे. हाच माझा जबानी रीपोर्ट असुन सांगणे प्रमाणे लिहिला वाचुन पाहीला बरोबर आहे. **अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल** |

➢ जबरी चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | वलगांव अप क्र. १६३/२०२३ कलम ३९२, ३४ भादवि. | राधासिटी वलगांव | घ. ता. वेळ दि. १९/०५/२०२३ चे २२/१० वा माहीती दि. १९/०५/२०२३ चे २२/३० वा दाखल ता. वेळ दि. २०/०५/२०२३ चे ०१/४८ वा | राहुन भिमरावदी भगत वय ४७ वर्ष रा. राधासिटी क्र. १ वलगांव | ३ अज्ञात ईसम | हकीकत अशा प्रकारे आहे. की नमुद घटणा ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी हे वलगांव येथील देशी दारुचे दुकानावर मागील काही वर्षा पासुन मॅनेजर म्हणुन काम करीत आहे. फिर्यादीने दि. १९/०५/२०२३ रेजी सकाळी ०७/३० वा देशी दारुचे दुकान उघडुन दिवस भर विक्री करुन त्यात जमा झालेली सर्वे रक्कम रात्री दुकान बंद करुन २२/०० वा निघुन रक्कम धेवुन घरी येत असतांना घरा जवळ राधासिटी क्र. १ वडणावर ३ अज्ञात व्यक्तीनी त्यांनी गाडी थांबवुन त्यांना तोडांवर झापडी मारुन त्यांची अंदाजे रक्कम १, २५,०००/- रु ची रोख रक्कम (एक लाख पंचविस हजार ) घेवुन दुचाकी वर बसुन खारतळेंगाव च्या दिसेने पळुन गेले आहे. अशा फिर्यादी च्या रिपोर्ट वरुन पो. स्टे. ला आप क्र. १६३/२०२३ कलम ३९२, ३४ भा.द.वि गुन्बा नोंद करम्यात आलेला आहे. अशा फिर्यादीच्या जबावी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ विश्वासघात (फसवणुक) :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ६७६/२३ कलम ४१९,४२० ,३४भादवि | व्रुंदावन कॉलनी कांता नगर रोड कॅम्प अमरावती | दि २१-०४-२३ ते ०१.०५.२०२३ चे दरम्यान<br>दि २०-०५-२३ ००-३७ वा | प्रविण सुभाष साळूंखे वय ३८ वर्षे रा.c/o प्रभाकर तायडे व्रुंदावन कॉलनी कांता नगर रोड कँम्प मरावती | एक मोबाईल क्र. चा धारक ,<br>२. एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकाणी फीर्यादीचे मोबाईलवर व्हाटस अप क्र वर पार्ट टाईम जॉब करीता मॅसेज आला व सदरचा जॉब सिम्पल असून पार्ट टाईम दिवसाचे १५०/- ते ६०००/- कमवू शकता असे सांगण्यात आले व फीर्यादीला व्हॉटसअप वरुन यु टयुब ॲप वरील व्हीडीओ च्या तीन लिंक सेंड केल्या व फीर्यादीस म्हणाले व्हीडीओ लाईक करुन स्क्रीन शॉट पाठवा व त्यानंतर फीर्यादीला सॅलरी साठी टेलीग्राम ॲपवरुन कॉन्ट्राक लिंक पाठवली व सॅलरी साठी कॉन्ट्रक करण्यास सांगितले. फीर्यादीने सदर लिंकवर कॉन्ट्रॅक केला असता फीर्यादीला नाव , वय व्हाट्सअप नंबर विचारला व सॅलरी साठी अप्लाय करत आहे असे सांगून फीर्यादीला बँक डीटेल्स विचारण्यात आले व फीर्यादीचे बँक अकाउंट ला अनोळखी व्यक्तीकडून १५०/-, १००/-,१५०/-,१००/- पाठविले व नमुद आरोपी याने फीर्यादीस इजी जॉब ग्रुपमध्ये व्हीडीओ ऑर्डर टास्क व प्रिपेड मिशन टास्क करावा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ६६(सि)(डी ) आय टी अँक्ट | | | | | लागली असे सांगितले व आरोपी क्र ०२ ने फीर्यादीला इनस्टकटर लिंक पाठवली व लॉगीन करण्यास सांगितले व फीर्यादीस टास्क करीता १०००/- रु जमा करण्यास सांगितले व परत सेकंड टास्ककरीता १००/- रु जमा करण्यास सांगितले व त्यानंतर एका अनोळखी व्यक्तीकडून फीर्यादी चे बँक खात्यात १४३०/- रु जमा झाले. व त्याच दिवशी फीर्यादीचे खात्यावर १२५/-,१५०/-,१५०/-,१७५/- असे पैसे जमा झाल्याने फीर्यादीला विश्वास वाटू लागला. त्यामुळे फीर्यादी यांनी आरोपीने सांगितल्या प्रमाणे वेगवेगळया यु पी आय - आय डी पुढील प्रमाणे तारखे निहाय रक्कम पाठवली दि. २२.०४.२०२३ = १०००/-,१००/- दि. २९.०४.२०२३ - ३०००/-, ३१००/-, २०००/- , ५००/-, दि. ०१.०५.२०२३- ३०००/- , ३०००/- , १७,०००/-, २५,०००/- अशी एकुण ६०,७००/- रु पाठविले. त्यापैकी २१,३१०/- रु फीर्यादीला वेगवेगळया बँक अकाउंट मार्फत परत मिळाली व नमुद आरोपीतांनी संगणमताने फीर्यादीचा विश्वासघात करुन उर्वरीत रक्कम ३९,३९०/- रु ची फीर्यादीचा फसवणूक केली. अश्या फीर्यादीचे चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

- ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र ३५८/२०२३ कलम ४,२५ आर्म अँक्ट, कलम १३५ ,१४२महा. पोलीस कायदा | एकता नगर बिच्छु टेकडी अमरावती | दि. २०.०५.२०२३ चे ०२.४५वा.<br><br>दाखल दि. २०.०५.२०२३ चे ०५.०९वा. | सरतर्फे पोहेकाँ योगेश श्रीवास ब.नं. १०१५, पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती | प्रफुल उर्फ सोन्या अजय वानखडे वय २० वर्ष, रा. एकता नगर बिच्छु टेकडी अमरावती<br>दा.गुन्हे १)२३०/२०१६ कलम २७९,३३७,भादवि, २) १२८/N/A कलम ३०७,४२७,३२३,५०४,३४ भादवि | हकीगत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी हे पो. स्टे. फ्रेजरपुरा येथे तैनातीस असुन ते डी.बी. प्रमुख म्हणुन काम पाहतात आज दि. १९.०५.२०२३ चे २३.०० वा. पासुन ते दि. २०.०५.२०२३ चे ०४.०० वा. पावेतो प्रेजरपुरा हद्दित सोबत पोउपनि अजय मोरे व जि.बी. पथककाती कर्मचारी याचे सहर कोबिंग ऑपेशन राबवित फ्रेजरपुरा हद्दित पेट्रोलींग करित असतांना आशियाना पोलीस संकुल पंचवची चौक अमरावती येथे ०२.४० वा एका गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीलायक खबर मिळाली की, एकता नगर बिच्छु टेकडी अमरावती येथे राहणारा तडीपार इसम प्रफुल उर्फ सोन्या अजय वानखडे वय २० वर्ष, रा. एकता नगर बिच्छु टेकडी अमरावती हा आपले राहते घरी इलेक्ट्रीकल तसेच बॅटरी लाईटच्या उजेडात पाहणी केली असता त्याचे राहते घराचे स्लॅबवर एक इसम हजर दिसता ते पंचाना दाखवुन त्या इसमास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारले त्याने वरिल प्रमाणे सांगीतले त्याची पंचा समक्ष अंगझडती घेतली त्याचे ताब्याच एक लोखंडी एक लोखंडी पात्याची धारदार शस्त्र कि. अं. २००/- रु. जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करन्यात आली. तसेच आरोपीतांनी मा. पोलीस आयुक्त सा. यांचे कलम ३७(१)(३) महा. पोलीस कायदा अन्वये जारी आदेशाचे उल्लघन करुन हातामध्ये धारदार शस्त्र चाकु व तलावर घेवुन लोकांमध्ये दहशत निर्माण केल्याने त्याचे हे कृत्ये |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कलम ४,२५ आर्म अँक्ट, कलम १३५,१४२ महा. पोलीस कायदा प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे बडनेरा अप.क्र.३६ ६/२३ कलम १३५ भाविका. | राहते घर एहतेशाम नगर अमरावती | घटना ता.वेळ - दि.०७.०९.२०२२ चे १२.५० वा. माहिती ता.वेळ - दि.२०.०५.२०२३ चे ११.०० वा. दाखल ता.वेळ - दि.२०.०५.२०२३ चे ११.३३ वा. | सौरभ संजय बारब्दे वय ३१ वर्षे रा सहाय्यक अभियंता भाजी बाजार वितरण केंद्र | अब्दुल वसिम अब्दुल गप्फार वय- ५५ वर्ष रा. एहतेशाम नगर अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांच्या स्टाफसह वीज चोरी पकडणे मोहीम राबवित असतांना आरोपीने त्याच्या मिटरमध्ये अनधिकृतपणे छेडछाड करून महावितरण चे ३१९५युनिटची ४५७९०रु. ची विज चोरी केल्याचे आढळुन आले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पोस्टे बडनेरा अप.क्र.३६ ७/२३ कलम १३५ भाविका. | राहते घर जामिया नगर अमरावती | घटना ता.वेळ - दि.०२.११.२०२२ चे १२.१० वा. माहिती ता.वेळ - दि.२०.०५.२०२३ चे १२.०० वा. दाखल ता.वेळ - दि.२०.०५.२०२३ चे १२.१२ वा. | सौरभ संजय बारब्दे वय ३१ वर्षे रा सहाय्यक अभियंता भाजी बाजार वितरण केंद्र | श्रीमती शाहेदा बानो शेख शौकत वय- ६८ वर्ष रा. जामिया नगर अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांच्या स्टाफसह वीज चोरी पकडणे मोहीम राबवित असतांना आरोपीने त्याच्या मिटरमध्ये अनधिकृतपणे छेडछाड करून महावितरण चे १०४४ युनिटची १४४६० रु. ची विज चोरी केल्याचे आढळुन आले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | पो.स्टे. बडनेरा अप.नं. ३६५/२३ कलम १३५(III) महा. पो. का. | कमलीवाले बाबा दर्गा समोरील, सार्वजनिक मैदान, अलमास नगर, जुनी वस्ती, बडनेरा. | दि. १९.०५.२३ चे २२.०५ वा. ते दि. २०.०५.२३ चे ०४.०० वा. दरम्यान. | सरतर्फे व.पो.नि. नितीन मगर, पो. स्टे. बडनेरा, अमरावती शहर. | १)मजहर खाँ अफसर खाँ, वय अं ५० वर्षे, रा. अलमास नगर, बडनेरा. २) अब्दुल सत्तार अब्दुल कादर, वय अं. ६० वर्षे, रा. नुर नगर, बडनेरा, ३) रऊफ खाँ सरफराज खाँ, वय अं. ७० वर्षे, ४) अब्दुल सलीम अब्दुल हफीज, वय ५० वर्षे,रा. चमन नगर, बडनेरा, ५) अब्दुल शगीर अब्दुल मजीद, वय ५० वर्षे, ६) अब्दुल रऊफ पटेल अब्दुल रफीक, यय अं. ४५ वर्षे, रा अलमास नगर, बडनेरा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद आरोपी हे अलमास मियाँ उर्फ कमलीवाले बाबा दर्गा चे पदाधिकारी असुन त्यांच्या विनंती अर्जाप्रमाणे पो स्टे स्तरावर त्यांना उर्स कार्यक्रमाची परवानगी अटी व शर्ती प्रमाणे देण्यात आली होती. दि. १९.०५.२३ चे २२.०० वा. पावतो सदर ठिकाणी कव्वाली कार्यक्रमाकरिता परवानगी देण्यात आली होती. तरी सुध्दा नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी कव्वालीचा कार्यक्रम लाऊड स्पिकर वाजवुन सुरू होता. करिता नमुद आरोपीतांविरूध्द सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | पो स्टै गाडगे नगर अम. अप क्र ६७८/२०२३ कलम २९४,५०६ (ब),३४ भादवी | वेलकम टी पॉइंट अमरावती | १९.०५.२०२३ चे १९.३० वा दरम्यान दातावेळ २०.०५.२०२३ चे ०१.१२ वा | अविनाश रामक्रुष्ण डखरे वय ४८ वर्ष व्यवसाय झुनका भाकर केंद्र जात कुणबी रा विंचुरकर यांचे घरी भाड्याने रहाटगाव अमरावती | अमित मुंदडा व क्रीष्णा आवणकर व मोहन विश्वकर्मा सर्व रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फीर्यादी हा आज दिनांक १९.०५.२०२३ रोजी संध्याकाळी ०७.३० वा वेलकम टी पॉईंट हजर असताना फीर्यादी जवळ आरोपी हे आले व फीर्यादी म्हणाले की तु आमच्या सोबत वाद विवाद का करत असतो तेव्हा फीर्यादीने आरोपीस म्हटले की, तुम्ही ट्रव्हर्स पॅसेंजरच्या सिटा बरोबर बसवत जा या कारणावरुन आरोपी क्र १ मोहन विश्वकर्मा याने फीर्यादीस अश्लील शिवीगाळ केली व अमीत मुंदडा व क्रीष्णा आवनकर यांनी जिवे मारण्याची धमी दिली. अशा फीर्यादीचे जबानी रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ६ | पो स्टै गाडगे नगर अम. अप क्र ६७९/२०२३कलम २९४,५०६ (ब),१०९भादवी सहकलम ४/२५ आर्म अॅक्ट | श्रीनाथ ट्रान्सपोर्ट ऑफीस पाठ्यपुस्तक जवळ अमरावती | १९.०५.२०२३ चे १९.३० वा दरम्यान दातावेळ २०.०५.२०२३ चे ०१.३८ वा | नासीर खान उम्र ५७ वर्ष व्यवसाय ट्रक चालक रा गवळीपुरा चांदणी चौक अमरावती | शेख मोबीन वय ४५ र्वष आणि त्याचा मुलगा शेख अयान | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठीकाणी यातील फीर्यादीला आरोपी क्र १ ने फोन केला व म्हटले की, तु मेरी बदनामी क्यु कर रहा .मै तुझे देख लुंगा अशी धमकी दिली त्यानंतर आरोपी क्र २ हा श्रीनाथ ट्रान्सपोर्ट समोर येवून चाकू घेवून दहशतीचे वातावरण निर्माण करुन अश्लील शिवीगाळ केली. अशा फीर्यादीचे जबानी रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ७ | पो स्टै गाडगे नगर अम. अप क्र ६८०/२०२३कलम १५३(ए), १०९,५०४ ,५०६ भादवी सहकलम १३५ मपोका | ईर्वीन चौक अमरावती | १९.०५.२०२३ चे १६.२८ वा दरम्यान दातावेळ २०.०५.२०२३ चे ०१.३८ वा | सरतर्फे वपोनि आसाराम हीरुजी चोरमले वय ५३ वर्ष पो स्टे गाडगे नगर अमरावती शहर | स्वामी श्री भारतानंद सरस्वतीजी महाराज,हींदु शक्तीपिठ पालघर | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठीकाणी यातील स्टॉफ सह ईर्वीन चौक येथे गोवंश संरक्षण बंदो. असता आरोपी स्वामी श्री भारतानंद सरस्वतीजी महाराज यांनी दि. १४.०५.२०२३ रोजी गांधी चौक येथे पोहचली. यात्रेसोबत आलेले आयोजक यांनी भाषण केले सुरुवातीलाच आक्षेपार्ह शब्दांनी भाषणास सुरवात केली. भाषणामध्ये दोन धर्मामध्ये, समाजामध्ये शत्रुत्व वाढून सामाजिक एकोपा भंग होईल असे प्रक्षोभक वक्तव्य केले. चिथावणी दिली, उपस्थीतामध्ये लोकांमध्ये समाजामध्ये स्वस्थपणा भंग होईल व मनुष्याला क्रोध येईल असे भाष्य केले तसेच विशीष्ट धर्माविरुध्द एकजुट होण्याची आवाहन केले अशा भाषणामुळे दोन धर्मात जातीय तेढ निर्माण होवून एकमेकांविरुध्द क्रोध निर्माण होवून सामाजिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला सदरचे क्रुत्य कलम १५३(ए),१०९,५०४,५०६ भादवी सहकलम १३५ मपोका अशा फीर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | राजापेठ अमरावती शहर अप. क्रमांक 469/2023 कलम – 142 म.पो.का. | देशपांडे प्लॉट नवाथे, अमरावती | दि. 20.05.2023 चे 01.00 वा दरम्यान<br><br>दि. 20.05.2023 रोजीचे 02.10 वा. | सरतर्फे पोउपनि गंगाधर जाधव, पोस्टे राजापेठ अमरावती | अक्षय सहदेवराव निखार, वय- 27 वर्ष, रा.- देशपांडे प्लॉट नवाथे, अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी पो स्टे राजापेठ येथे लेखी तक्रार दिली की, आज दिनांक 19.05.2023 चे 24.00 वा. ते 20.05.2023 चे 05.00 पावेतो दरम्यान आम्ही सोबत सपोउपनि/883, पोहवा/158,323, पोना/1336,26,1362,432, 1141,105,1349 पोशि/223 असे कोंबींग ऑपरेशन दरम्यान पो स्टे हददीत गुन्हेगार चेक, प्रोव्ही रेड पेट्रोलिंग करीत असतांना 01.00 वा विश्वसनीया गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, तडीपार आरोपी नामे अक्षय सहदेवराव निखार हा त्याचे राहते घराजवळ फिरत आहे अशा मिळालेल्या माहितीवर पो स्टाफ व सोबत दोन पंच घेवुन त्याचे घरी जावुन चेक केले असता तडीपार आरोपी हा त्याचे राहते घराजवळ मिळुन आला त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव अक्षय सहदेवराव निखार, वय- 27 वर्ष, रा.- देशपांडे प्लॉट नवाथे, अमरावती असे सांगितले पंचासमक्ष त्याची झडती घेतली असता कोणतेही मौल्यवान वस्तु मिळुन आली नाही तसेच नमुद तडीपार आदेश बाबत विचारपुस केली असता कोणताही स्थगनादेश सादर करु शकला नाही. सदर तडीपार इसमास अमरावती शहरात प्रवेश करण्याचे कारण विचारले असता कोणतेही उडवा उडविचे व असमाधानकारक उत्तरे दिल्याने त्यास पो स्टाफ चे मदतीने पोलीस स्टेशनला आणले आहे. तरी सदर इसमाने मा पोलीस उपायुक्त परिमंडळ-2 अमरावती शहर यांचे आदेश क्र पोउपआतडीपार/परि-2/324/2022 दि. 23.02.2022 अन्वये अमरावती अन्वये 02 वर्षाकरीता अमरावती जिल्ह्यातुन तडीपार करण्यात आले |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | असतांना देखील नमुद इसम हा कोणत्याही सक्षम अधिका-याची परवानगी न घेता अमरावती शहरात दिसुन आला आहे. तरी त्याचे विरुध्द १४२ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल |
| ९ | वलगांव अप क्र. १६४/२०२३ कलम ५, (अ) (१) महा. प्रा. र. (सु) अधि. १९९५ सह कलम ११,(३) (ड) प्रा. कृ.वा. प्र. का. १९६० सह कलम १८४, मो. वा. का. प्रमाणे गुन्हा दाखल | खारतळेंगाव ते वायगांव रोड | घ. ता. वेळ दि. २०/०५/२०२३ चे ०२/३० वा. माहीती दि. २०/०५/२०२३ चे ०३/०० वा<br>दाखल ता. वेऴ दि. २०/०५/२०२३ चे ०७/३६ | ASI प्रदिप श्रीरंग सावरकर बं नंबर १६पो. स्टे. वलगांव अमरावती शहर | १) MH-३०-BD-२७६४ २) MH-३०-BD-३६७६ दोन्ही बोलेरो पिकअप गाडीचे चालक (फरारी) | हकीकत अशा प्रकारे आहे. की यातील फिर्यादी यांची दि. १९/०५/२०२३ रोजी चे २३/०० वा पासुन ते दि. २०/०५/२०२३ रोजी चे ०४/०० वा पावेतो पो. स्टे. वलगांव हद्दीत पो. स्टाँप सोबत कोंबिग ड्युटी असतांना गुप्त बातमीदारा कडुन खात्री लायक गोपणीय माहीती मिळाली की वायगांव कडुन खारतळेंगाव कडे दोन बोलेरो पिअकप गाड्या ज्या मध्ये जनावरे आहे अशा गाड्या जानार आहे. अशा माहीती वरुन पो. स्टाँप सह मिळालेस्या माहीती वरुन गेलो असता वायगांव कडुन खारतऴेंगाव कडे येणारे दोन गाड्या १) MH-३०-BD-२७६४ २) MH-३०-BD-३६७६ दोन्ही बोलेरो पिकअप गाड्या दिसल्या थांबविण्याचा ईशारा केला असता त्या थांबल्या नाही वरुन त्या गाड्याचा पाढलाग केला असता त्या गाड्यांच्या चालकांनी सदरच्या गाड्या रस्त्याच्या कडेला लावुन पळुन गेले सदर वाहाऩाची पाहणी केली असता सदर वाहाना मध्ये १) महीद्रा बोलेरो गाडी क्र. MH-३०-BD-२७६४ मध्ये ३ गोवंश बैल जातीचे जनवरे २) महीद्रा बोलेरो गाडी क्र. MH-३०-BD-३६७६ मध्ये ३ गोवंश बैल जातीचे जनवरे असे एकुन ६ जनावरे कि. अ. ७५,०००/- रु दिसुन आले तसेच महीद्रा बोलेरो गाडी क्र. MH-३०-BD-२७६४ कि. ६,०००००/- रु व महीद्रा बोलेरो गाडी क्र. MH-३०-BD-३६७६ कि. ५,५००००/- रु असा एकुन १२,२५,०००/- रु चा माल मिळुन आला घटणास्थळा वरुन जप्ती पंचनामा प्रमाणे जप्त करण्यात आला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ जुगार रेड :-

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | पो.स्टे.फ्रेजरपुरा अम.शहर | अप क्र. ३६२/२०२३ कलम १२(अ)जुगार महा.जुगार ॲाक्ट | लुंबीनी नगर अमरावती | दि.१९/०५/२०२३ चे २२.५५ वा | दि.२०/०५/२०२३ चे ०१.१८ वा | पोहेकॉ योगेश श्रीवास ब.नं. १०१५, पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती | १- एक महिला<br>२) एक महिला<br>३) ओमप्रकाश रामाजी वाहाने वय ४७ वर्ष,रा. यशोदा नगर नं. १ गल्ली नं.०४ अमरावती<br>४) प्रभाकर झामाजी गवई वय ६१ वर्ष, रा. यशोदा नगर नं. १ गल्ली नं.०४ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादी हे पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती येथे तैनातीस असुन ते पो.स्टे. ला हजर असतांना पो.स्टे.चे फोनवर माहीती मिळल्यावरुन पो.स्टाफ सह नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी नमुद आरोपीत इसम यांचेवर जुगार रेड केली असता आरोपी क्र. १ ते ०३ ह्या पोलीसांना पाहुन पळुन गेल्या पाठलाग केला मिळुन आल्या नाही तसेच आरोपी क्र.०३ व ०४ हे जागीच मिळुन आले त्यांना घेवुन त्याची जुगार बाबत अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यातुन वरली मटका आकडे लिहिलेल्या ०४ कागदी चिठ्या नगर ११३०/-रु. असा एकुण ११३०/-रु.चा.माल जप्ती पंचनाम्या प्रमाणे जप्त करण्यात आला आहे अश्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

➢

➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | अप क्र. ३६१/२०२३ कलम ६५(ई) म.दा.का. | दारुबंदी | बेनोडा येथील सरकारी संजाजवळ,अमरावती | दि.१९/०५/२०२३ चे २२.१५वा | दि.२०/०५/२०२३ चे ००.३३ वा | सरतर्फे पो.हे.कॉ. योगेश श्रीवास ब.नं.१०१५ पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | महेश नारायण इंगोले वय ४५ वर्ष, रा. बेनोडा झोपपट्टी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादी हे मा. व.पो.नि.सा.यांचे आदेशाने पो.स्टे. फ्रेजरपुरा हद्दित डी.बी. पथकातील कर्मचारी सह पेट्रोलींग करित असतांना एका गुप्त बातमीदार कडुन खात्रीलायक खबर मिळाल्या वरुन नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी आरोपी महीला हिचे वर प्रो.रेड केली असता पंचासमक्ष त्याचे ताब्यातुन देशी दारु संत्रा बॉबी च्या १८०एम.एल. १० पावट्या प्रत्येकी/-रु. प्रमाणे एकुण किं.अं.६००/-रु. चा प्रोव्ही माल जप्त करण्यात आला नमुद आरोपी हिचे कृत्य कलम ६५(ई)म.दा.का. प्रमाणे होत असल्याने त्याचें विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | पो स्टे गाडगे नगर अम. | अप क्र.६७७/२०२३ कलम ६५ ई मदाका | प्रोव्हीशन | विलास नगर गल्ली नं. ४ अमरावती | १९.०५.२०२३ रोजी चे १९.३० वा ते २०.०० वा दरम्यान | २०.०५.२०२३ चे ००.५४ वा | सरतर्फे पोहेकॉ निळकंठ गवई बन १००५ पो स्टे गाडगेनगर अमरावती | राजेश दादाराव श्रीराव वय ५० वर्ष रा विलास नगर गल्ली नं १ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे नमुद घतावेळी व ठीकाणी यातील फीर्यादी ला गुप्तदाराकडून माहीती मिळाल्यावरुन नमुद आरोपीवर प्रोव्ळी रेड केली असता त्याचे ताब्यातून ४८ नग देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मिली मापाच्या बाटल्या किं ३३६०/-रु चा माल मिळून आल्यावरुन सदर चा गुन्हा दाखल |
| ३. | पो.स्टे. खोलापुरी गेट अमरावती शहर | अप.न. ९५/२०२३ कलम ६५(ई) म.दा.का. | अवैद्यरित्या देशी दारुची विक्री करणे | गांधी आश्रम अमरावती | दि. १९/०५/२०२३ चे २३/१५ वा ते २३/४५ वा. | दि. २०/०५/२०२३ चे ००/१० वा. | सरतर्फे ना.पो.का. मंगेश भेलाये ब.न. २०२ पो.स्टे. खोलापुरी गेट अमरावती शहर | दिपक केरुजू सावळे वय ५४ वर्ष रा. गांधी आश्रम अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादी हे पो.स्टे. पो.स्टाफ सह पो.स्टे. हद्दीत कौंबीग आपरेशन करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, यातील नमुद आरोपी हा अवैद्यरित्या देशी दारुची विक्री करीत आहे अशा माहीती वरुन यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना पो.स्टाफ सह यातील नमुद आरोपी याचे प्रो रेड केला असता यातील आरोपी याचे ताब्यातुन १२ नग देशी दारु टँगो पंच कंम्पनीच्या १८० मि.ली. च्या सिलबंद पावट्या कि.अं. ८४०/- रुपये मिळुन आल्याने तो पंचासमक्ष घटनास्थळ जप्ती पंचनाम्याप्रमाने जप्त करण्यात आला. अशा फिर्यादीचे लेखी रिपोट्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |